# महाराष्ट्र शासन

**संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य.**
**कोकण भवन,सहावा मजला,नवी मुंबई ४०० ६१४**

☎ -०२२/२७५७१३११.
🖷:- ०२२/२७५६३८२४.

*E.Mail:- calfak6@yahoo.com*


**कार्यालयीन आदेश क्रमांक २३ दिनांक 19 APR 2011**

विषय :- स्थानिक स्वराज्य संस्था व इतर संस्था यांचे लेखापरीक्षण विहीत मुदतीत करणे बाबत.

संदर्भ :- १) आदेश/परिपत्रक क्र.स्था.४/ब/ले.प.कार्यक्रम/१५३६ दि.२४.१०.२००८
२) परिपत्रक क्र.स्था.१८/ब/सन २००७.०८/ले.प.अ/पंरास/१६९४ दि.२७.११.२००८
३) परिपत्रक क्र.स्था.१८/ब/सन २००७.०८/ले.प.अ/पंरास/१५३६ दि.२४.१०.२००८
४) कार्यालंयीन आदेश क्र.३६ दिनांक ३० जुलै २००९.

या संचालनालयाच्या अधिनस्त असणाऱ्या जिल्हा कार्यालयामार्फत संबंधित जिल्हयातील जिल्हा परिषदेचे विविध विभाग/पंचायत समिती/नगरपरिषदा/नगरपरिषद शिक्षण मंडळे/ग्रामपंचायत/संकीर्ण संस्था व इतर संस्था इत्यादीचे लेखापरीक्षण दरवर्षी करण्यात येते. या लेखापरीक्षणामध्ये एकसूत्रता राहणे तसेच विहित मुदतीत लेखापरीक्षण पूर्ण करण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१) शासन अधिसुचना वित्त विभाग क्र.सेवाप्र-११.०७/प्र.क्र.१९६/२,कोषा (प्रशा-३) दिनांक २.१२.२००८ अन्वये या संचालनालयात अस्तित्वात असलेला गट क मधील संवर्ग अस्तगंत करुन लेखापरीक्षा लिपीक/कनिष्ठ लेखापरीक्षक/वरीष्ठ लेखापरीक्षक हा संवर्ग नव्याने निर्माण करण्यात आलेला आहे. त्यामुळे या लेखापरीक्षकांच्या सेवा सर्व स्थानिक स्वराज्य संस्था तसेच ग्रामपंचायत ,पंचायत समिती,जिल्हा परीषद , नगरपरिषद व नगरपालिका शिक्षण मंडळ ,संकीर्ण संस्था व इतर संस्था यांच्या लेखापरीक्षण कामकाजासाठी आवश्यकतें नुसार वापरणे बाबत निर्देश या कार्यालयाचे परिपत्रक क्र.स्था.१८/ब/गट क/से.प्र.नि/अमंलबजावणी/स.अ-४/१६५७ दिनांक १५ ऑक्टोबर २००९अन्वये दिलेले आहेत.

२) दरवर्षी माहे जुलै पासून जिल्हापरिषदेच्या विविध विभागाचे व पंचायत समितीचे लेखापरीक्षण हाती घेण्यात यावे व हे लेखापरीक्षण माहे सप्टेंबर अखेर जिल्हयातील उपलब्ध असणाऱ्या सर्व लेखापरीक्षकांद्वारे पूर्ण करावे.

३) जिल्हा परिषद व पंचायत समितीचे लेखापरीक्षण वरील प्रमाणे पूर्ण झाल्यानंतर माहे ऑक्टोबर मध्ये सर्व लेखापरीक्षकांच्या सेवा वापरुन जिल्हयातील सर्व नगरपरिषदा व नगरपालिका शिक्षण मंडळे यांचे लेखापरीक्षण पूर्ण करण्यात यावे.

४) माहे नोव्हेंबर मध्ये वरील पैकी अपूर्ण असणारे लेखापरीक्षण पूर्ण करावे तसेच जिल्हयातील इतर सर्व संकीर्ण संस्था यांचे लेखापरीक्षण पूर्ण करावे.

५) स्थानिक स्वराज्य संस्थाचे लेखापरीक्षण वरील प्रमाणे माहे नोव्हेंबर मध्ये संपल्यानंतर जिल्हयातील सर्व लेखापरीक्षकांच्या सेवा ग्रामपंचायतीच्या लेखापरीक्षणासाठी वापरुन माहे डिसेंबर ते जून या कालावधीत सर्व ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण हाती घेण्यात येऊन ते पुर्ण करण्यात यावे.

६) जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगरपालिका यांचे लेखापरीक्षण पथक प्रमुख म्हणून सहाय्यक संचालक यांनी प्रत्यक्ष लेखापरीक्षण करणेबाबत यापूर्वी दिलेले आदेश या पुढेही चालू राहतील.

सदरचे आदेश हे जुलै २०११ पासून हाती घ्यावयाच्या लेखापरीक्षणास लागू राहतील.

(के.एम.विधाते)
संचालक
स्थानिक निधी लेखासंचालनालय,
महाराष्ट्र राज्य,
नवी मुंबई.

प्रत

१) सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा,मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

२) सहायक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, सर्व.

३) सहायक संचालक,स्थानिक निधी लेखापरीक्षा,अहवाल शाखा.

४) अभिलेखापाल.